# सेतू अभ्यास २०२३ : मराठी – इयत्ता नववी : पूर्व चाचणी

**इयत्ता : नववी** **एकूण गुण : ३०**

**विद्यार्थ्याचे नाव :** ........................................................................ **हजेरी क्र. :** ..................

**शाळेचे नाव :** ........................................................................ **दिनांक :** ....................

## विभाग १ : गद्य

**प्र. १) खालील उतारा वाच व त्यावर आधारित कृती सोडव. (08.01.12)**

विद्यार्थी जीवनात चांगल्या सवयींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चांगले साहित्य वाचणारा, योग्य त्याच बाबी लक्षात ठेवणारा, योग्य ठिकाणी खर्च करणारा, आवश्यक असेल तेवढेच बोलणारा, नेहमीच इतरांच्या मदतीसाठी तत्पर असणारा विद्यार्थी भावी आयुष्यात समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करतो. त्याने निवडलेल्या क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी त्याला विशेष मेहनतीची आवश्यकता पडत नाही.

तुम्ही जोपर्यंत मार्गदर्शन मिळवण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेणार नाहीत, तोपर्यंत तुम्हांला कोणाचेही मार्गदर्शन मिळणार नाही. आपल्याला काय करायचे याची दिशा दुसरा ठरवणार नाही. तुम्हांलाच दिशा ठरवायची आहे आणि तुम्हांलाच त्या दिशेने चालायचेही आहे. हे स्वप्रयत्नानेच शक्य आहे. चांगल्या सवयी केवळ स्वप्रयत्नाला चालना देत नाहीत, त्या केवळ ध्येय गाठून थांबत नाहीत, तर त्या संपूर्ण मानवी गुण वृद्धिंगत करण्यास मदत करतात.

**अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती कर.**

**१) आकृतिबंध पूर्ण कर.** **(२ गुण)**

....................................

.................................... ← **समाजात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंगी असणारे गुण** → ....................................

....................................

**आ) खालील चौकटी पूर्ण कर.** (२ गुण)

१) निवडलेल्या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी याची आवश्यकता असते. ..............................

२) चांगल्या सवयी या गोष्टीला चालना देतात. ..............................

**इ) स्वमत :** (३ गुण)

१) 'चांगल्या सवयीं'चे महत्त्व तुमच्या शब्दांत लिही.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## विभाग २ : पद्य

**प्र. २ कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती कर. (08.01.10)**

माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई, तिच्या रहावे ऋणात होऊ नये उतराई.
तिच्या एकेका शब्दाला रत्न – कांचनाचे मोल, कधी तप्त लोहा परी कधी चांदणे शीतल.
रानवाऱ्याच्या गंधात माझी मराठी भिजली, लेऊनिया नाना बोली माझी मराठी सजली.
माझ्या भाषेचे अमृत प्राशेल तो भाग्यवंत, तिचा नाही दुजाभाव असो कोणताही पंथ.
माझ्या मराठी भाषेची काय वर्णावी थोरवी, दूर देशी ऐकू येते? माझ्या मराठीची ओवी.

मृणालिनी कानिटकर–जोशी

**अ) आकृतिबंध पूर्ण कर.** (२ गुण)



**आ) एका शब्दात उत्तर लिही.**

१) मराठी भाषेचे कवयित्रीशी असलेले नाते : ..................................

२) मराठी भाषा कशाच्या गंधात भिजते : ..................................

**इ) खालील काव्यपंक्तीचा सरळ अर्थ लिही.** **(२ गुण)**

माझ्या भाषेचे अमृत प्राशेल तो भाग्यवंत, तिचा नाही दुजाभाव असो कोणताही पंथ.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

**ई) स्वमत**

१) वरील कवितेतील कोणत्या काव्यपंक्ती तुला आवडल्या व का? ते लिही. **(२ गुण)**

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

## विभाग ३ : भाषाभ्यास

**प्र. ३)** **(08.01.18)**

**१) अलंकार :** **(२ गुण)**

**खालील तक्ता पूर्ण कर.**

| अलंकाराचे नाव | लक्षण | उदाहरण |
|---|---|---|
| .................... | उपमेय व उपमान यांत साम्य असते. | ...................................................... |

२) **समास :** **(२ गुण)**

**खालील तक्ता पूर्ण कर.**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| ...................... | पोळीसाठी पाट | .................................................... |

३) **वाक्प्रचार :** **(२ गुण)**

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर. (कोणतेही २)

१) कंठ फुटणे २) कानात प्राण आणून ऐकणे

३) जीवाचा आकांत करणे ४) निर्धारित करणे

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

४) **खालील तक्ता पूर्ण कर.** **(१ गुण)**

| विशेषण | विशेष्य |
|---|---|
| सुंदर | .............................. |

## विभाग ४ : उपयोजित लेखन

**प्र. ४ पत्रलेखन : (08.01.14)**

अ) तुझ्या मित्राने/मैत्रिणीने त्याच्या गावाजवळ घडलेल्या अपघाताप्रसंगी प्रसंगावधान राखून केलेल्या मदतीबाबत त्याचे/तिचे अभिनंदन करणारे पत्र लिही.

**किंवा**

वही व पुस्तक या दोघांमधील संवादाची कल्पना करून संवादलेखन कर. **(५ गुण)**

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

**आ) कथालेखन : खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिही. (08.01.15)** **(५ गुण)**

**मुद्दे :** एक गुणी मुलगा, बिघडलेल्या मुलाची संगत, अभ्यासावर परिणाम, वडिलांचा ओरडा, आंब्याची पेटी, सगळे आंबे सडणे, बोध.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................